



दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ  Mob- 9822720784  Email- jansanchlan@gmail.com  RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे  अंक : ३३६ वा  सोमवार दि ०६ एप्रिल २०२६  पृष्ठ ८  किंमत ३ रुपये


# काँग्रेसला तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असा पराभव करु; बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार दिल्याने भाजपचा इशारा

**वृत्तसंस्था/ पुणे**

बारामती पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधत आक्रमक भूमिका मांडली. बारामतीत काँग्रेसने निवडणूक लढवू नये. जर लढलीच तर त्यांचा असा पराभव करू की त्यांना तोंड दाखवायला जागा राहणार नाही,फ्फ असा थेट इशारा त्यांनी काँग्रेसला दिला आहे. बावनकुळे यांनी अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाचा संदर्भ देत काँग्रेसला भावनिक साद घातली. अजित दादांचा बहुतांश राजकीय काळ काँग्रेससोबत गेला आहे. त्यांचे संबंध, सहवास आणि कामाचा इतिहास काँग्रेसशी जोडलेला आहे. त्यामुळे काँग्रेसने काही राजकीय संस्कार जपायचे असतील, तर त्यांनी बारामतीत निवडणूक लढवू नये आणि सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी उभं राहावं, असं ते म्हणाले. बारामतीतील विजयाबाबत त्यांनी मोठा दावा केला. ङ्गङ्गआम्ही स्वतः बारामतीत जाऊन सुनेत्रा पवारांचा उमेदवारी अर्ज भरू. बारामतीत ७५ टक्क्यांहून अधिक मतांनी विजय मिळवू. काँग्रेसचा आजवर कधीच झाला नसेल इतका मोठा पराभव येथे होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शरद पवार यांच्या भूमिकेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. मात्र भाजपची भूमिका अगदी ठाम आहे. बारामतीत काँग्रेसने निवडणूक लढवू नये.फ्फ शरद पवार यांच्या भूमिकेबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, त्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी. मात्र भाजपची भूमिका अगदी ठाम आहे. बारामतीत काँग्रेसने निवडणूक लढवू नये. दरम्यान, आज भाजपच्या वर्धापन दिनानिमित्त पक्ष संघटनाबाबतही त्यांनी महत्त्वाचे विधान केले. पक्षाचा विस्तार आणि बळकटीकरण हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. पुण्यात आणि राज्यात, देशभरात भाजपचे संघटन ५१ टक्क्यांपेक्षा अधिक नेण्याचा संकल्प केला आहे. युवकांना मोठ्या प्रमाणावर पक्षाशी जोडणार आहोत. राज्यभर संघटना मजबूत करण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले. अशोक खरात प्रकरणावर त्यांनी सावध भूमिका घेतली. हे प्रकरण संवेदनशील आहे. माझ्यासारख्या कार्यकर्त्यांनी माध्यमांसमोर यावर भाष्य करणं योग्य नाही. कडून जे निष्कर्ष समोर येतील त्यानुसारच कारवाई होईल. जर अधिकारी दोषी आढळले,



तर त्यांना बडतर्फ करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. दरम्यान, अजित पवार यांच्या अपघातावर काँग्रेसकडून गुन्हा दाखल करण्याच्या मागणीवर त्यांनी पलटवार केला आहे, निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अशा मागण्या केल्या जात आहेत. मात्र बारामतीतील जनता सुनेत्रा पवारांना प्रचंड मतांनी विजयी करेल आणि काँग्रेसला मोठा धक्का बसेल, असा दावा बावनकुळे यांनी केला.

# बारामतीवरून मविआत फूट? शरद पवारांच्या निवासस्थानी हाय व्होल्टेज बैठक, काँग्रेसच्या भूमिकेवर लक्ष...

**वृत्तसंस्था/ मुंबई**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसकडून उमेदवार देण्याचे निश्चित झाल्यानंतर आता या प्रश्नावरून महाविकास आघाडीतील फूट पुन्हा एकदा समोर आली आहे. काँग्रेसने उमेदवार देण्याचे निश्चित केले असतानाच शिवसेना (उबाठा) पक्षाकडून मात्र या पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुनेत्रा पवार यांना पाठिंबा देण्याचे निश्चित केल्याची माहिती सूत्रांनी दिली. परिणामी महाविकास आघाडीतील बेबनावची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केल्यानुसार बारामती आणि राहुरी या दोन मतदार संघांतील पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिलला मतदान होणार आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी इच्छा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वीच व्यक्त केली होती. त्यासाठी भाजपकडून प्रयत्नही सुरू होते. राष्ट्रवादी काँग्रेसकडून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार पोटनिवडणूक लढणार आहेत. मात्र, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष



हर्षवर्धन सपकाळ यांनी शुक्रवारी बुलडाणा येथे पत्रकारांशी बोलताना बारामतीत पक्षाकडून उमेदवार उभा केला जाणार असल्याचे सांगितले. सपकाळ यांच्या या विधानामागे येऊ घातलेल्या विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसला विचारल्या- शिवायच शरद पवार यांनी शिवसेनेला उमेदवारी देऊ केल्याच्या विधानामुळे दुखावलेल्या काँग्रेसच्या नेत्यांचा दबाव असल्याचेही बोलले जात आहे. महाविकास आघाडी म्हणून केवळ काँग्रेसनेच कायम त्याग करायचा व शिवसेना, राष्ट्रवादी (शप) यांनी कायम फायदाच घ्यायचा हे योग्य नसल्याचे राज्यातील अनेक काँग्रेस नेत्यांचे म्हणणे आहे. आयत्यावेळी दिल्लीहून हिरवा कंदील मिळाल्यास उमेदवारीसाठी घाई होऊ नये म्हणून काँग्रेसमधून काही नावांची चाचपणीही केली जात असल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाने बारामतीबाबत अद्याप भूमिका जाहीर केलेली नाही. या संदर्भात पक्षाकडून लवकरच अधिकृत भूमिका जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. याबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवारी राष्ट्रवादी (शप) पक्षाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत मुंबईतील सिल्व्हर ओक या त्यांच्या निवासस्थानी खलबते सुरू असल्याची माहिती पुढे आली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मायावी माओवाद्यांचा धोका!


चित्र : रोहन पोरे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी लोकसभेत जाहीर केले की, ङ्गमाओवादी समस्या संपली आहे.फ दशकभरापूर्वी अशक्यप्राय वाटणारी कामगिरी यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सरकार आणि सुरक्षा दले यांचे मनःपूर्वक अभिनंदन! खंबीर नेतृत्व, प्रचंड राजकीय इच्छाशक्ती आणि सुरक्षा दलाचे अपार कष्ट आणि अतुलनीय साहस यांमुळेच हे शक्य झाले आहे. त्यामुळे या सर्वांचे मनापासून अभिनंदन करणे आवश्यक आहे. माओवाद्यांनी हजारो निष्पाप नागरिक, सुरक्षाकर्मी, आमदार, खासदार, मंत्री, गृहमंत्री अशा असंख्य व्यक्तींना ठार मारलेले आहे. दोन-तीन पिढ्यांपासून माओवादग्रस्त भागातील जनता दहशतीत जगत होती. आता हे लोक मोकळेपणाने आयुष्य जगतील. उत्तरेतील पशुपतीपासून दक्षिणेतील तिरुपतीपर्यंत पसरलेला विस्तीर्ण माओवादी रेड कॉरिडॉर , हजारो कोटींची वार्षिक कमाई, गनिमी युद्धात तरबेज असलेली दहा हजारांपेक्षा जास्त संख्येतील एक प्रशिक्षित, अनुभवी खडी फौज (पीएलजीए), जंगलातील पीएलजीएला मदत करण्यासाठी शहरी भागात उभ्या केलेल्या शेकडो फ्रंट संघटना आणि त्यांच्याआडून काम करणारे लाखो समर्थक, उच्चविद्याविभूषित विद्वानांपासून अगदी दुर्गम भागातील निरक्षर आदिवासींपर्यंत उभी केलेली कार्यकर्त्यांची एक अभेद्य फळी... दहा-पंधरा वर्षांपूर्वीच्या या भीषण परिस्थितीचा विचार केला तर देशातून माओवादी हिंसाचाराचे निर्मूलन होईल याची कोणी स्वप्नातही कल्पना केली नव्हती. येत्या काळात माओवादी प्रभावक्षेत्रातील हिंसाचार बंद होईल. रस्ते, पूल, शाळा, कॉलेज, दवाखाने, व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण, नोकऱ्या यापासून वंचित ठेवलेले कोट्यवधी लोक आता विकासाकडे वाटचाल करतील. कुऱ्हाडीने हात, पाय, मुंडके छाटून टाकणे किंवा या कानापासून त्या कानापर्यंत गळा कापून माओवाद्यांनी ज्या हजारो निष्पाप लोकांच्या हत्या केल्या आहेत, तो मनोविकृत हिंसाचार आता थांबला आहे. तीन पिढ्यांपासून सतत मृत्यूच्या सावटाखाली कसेबसे जीवन जगणारे कोट्यवधी सामान्य नागरिक आता भयमुक्त झाले आहेत. अगदी १९६७च्या नक्षलबारी आंदोलनाच्याही आधीपासून आजपर्यंत माओवाद्यांनी आदिवासींना फक्त ङ्गवापरूनफ घेतले आहे. माओवादी आणि सुरक्षा दले यांच्या संघर्षात नेहमीच आदिवासींना पुढे केले गेले आणि त्यामुळे असंख्य आदिवासी मारले गेलेत. आता जेव्हा गैरआदिवासी माओवादी नेत्यांवर मरण्याची वेळ आली, तेव्हा मात्र त्यांनी पटकन शस्त्र टाकून शरणागती पत्करत स्वतःचा जीव वाचवला आहे. आता ही बाब संपूर्ण समाजाच्या लक्षात आलेली आहे. शरण आलेल्या या लोकांचे हात हजारो निष्पाप आदिवासींच्या रक्ताने माखलेले आहेत, हे आपला समाज कधीच विसरणार नाही. माओवाद्यांच्या हातून मारल्या गेलेल्या असंख्य लोकांच्या पीडित कुटुंबीयांना कधी आणि कोणता न्याय मिळेल, हा एक अनुत्तरित प्रश्नच आहे. तिभागा आंदोलन, तेलंगण आंदोलन, श्रीकाकुलम आंदोलन, गोपीबल्लभपूर आंदोलन, नक्षलबारी आंदोलन, आंध्र प्रदेशातील पीडब्ल्यूजी, बिहारमधील एमसीसी आणि नंतर त्यांचे विलीनीकरण होऊन तयार झालेला सीपीआय (माओवादी) पक्ष असा हा साम्यवादी प्रवास आहे. या हिंसक साम्यवादी आंदोलनांना समाजातून समर्थन मिळण्यामागे एक महत्त्वाचे कारण होते. पूर्वी जमीनदारी-सावकारी व्यवस्था अस्तित्वात होती. ही व्यवस्थाच मुळी विषमता, अन्याय आणि शोषणावर आधारित होती. गावातील एका कुटुंबाकडे हजारो एकर जमीन राहणार आणि त्याच गावातील इतर हजारो कुटुंब अर्धपोटी राहणार अशी स्थिती असेल तर त्याचा उद्रेक होतोच. शेवटी तेच घडले. उपाशी, अर्धपोटी भूमिहीन शेतमजुरांनी जमीनदारांच्या घरावर हल्ले केले. त्यांना ठार मारून त्यांच्या जमिनी आपल्या ताब्यात घेतल्या. हिंसाचाराचा हा वणवा सर्वत्र पसरला होता. याच रक्तलांच्छित पार्श्वभूमीवर तेलंगणातील पोचमपल्ली येथून आचार्य विनोबा भावे यांनी आपली प्रसिद्ध भूदान चळवळ सुरू केली होती. मरणाच्या भीतीने अनेक जमीनदारांनी पटापट जमीन दान केली आणि आपला जीव वाचवला. सरकारनेदेखील जमीन सुधारणा कायदे (सिलिंग) करून सामाजिक परिस्थितीत बदल घडवून आणला. समाजातील विविध घटकांच्या संतुलित विकास होईल याची जबाबदारी सरकारची असते. न्यायपूर्ण आणि शोषणविरहित समाजव्यवस्था असणे आवश्यक आहे अन्यथा अराजक निर्माण होते. कामगारांची हुकूमशाही आणि भांडवलदारांची मनमानी या दोन टोकांमधून एक ङ्गमध्यममार्गफ काढणे ही कसरत सरकारला करावी लागेल. एकाची हुकूमशाही आणि दुसऱ्याची मनमानी चालू दिली जाणार नाही, याचे भान सरकारला ठेवावे लागेल. सर्वच समाजघटकांचा न्यायपूर्ण आणि संतुलित विकास होईल हेच लोकनियुक्त सरकारचे कर्तव्य आहे. आज साम्यवादी हिंसाचार आटोक्यात आलेला असताना भांडवलदार मोकाट सुटणार नाहीत याची काळजी सरकारला घ्यावी लागेल. शासन यंत्रणा लोकाभिमुख आणि संवेदनशील राहून जनतेची कामे करतील याची खबरदारी सरकारला घ्यावी लागेल. निर्दय, भ्रष्ट आणि लुटारू शासन व्यवस्था नक्षलवाद्यांना जन्म देते हा जुना अनुभव विसरता येणार नाही.




The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

## सिंहस्थ कुंभमेळा अविस्मरणीय करण्याची मुख्यमंत्र्यांची बैठकीत ग्वाही..

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी 35 हजार कोटींची विकास कामे होणार : मुख्यमंत्री फडणवीस

**नाशिक/वृत्तसंस्था** : प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा भव्य व अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रियेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

अखिल भारतीय संत समिती-राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी



उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भाविकांना गोदावरीच्या निर्मळ आणि प्रवाही पाण्यात स्नान करता यावे, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. त्र्यंबकेश्वर येथे गोदावारीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक परिक्रमा मार्ग, रेल्वे स्थानकावरील सुविधा, घाटांची संख्या आणि लांबी वाढविणे, जुन्या मंदिरांचे संवर्धन, मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांचे रुंदीकरण, ओझर विमानतळाचे विस्तारीकरण आदी विकास कामे सुरू आहेत. साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे. साधूग्राममध्ये आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

तसेच कुंभमेळ्याकरीता प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या सूक्ष्म आणि नेटक्या नियोजनासाठी नाशिक येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने प्रयागराजचा दौरा केला होता. मागील कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा दहा पट अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. विकासकामे करतांना साधू, महंत आणि आखाड्यांकडून आलेल्या सूचनांचाही स्वीकार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

संत शक्ती ही सज्जनशक्ती असून साधू संतांनी भारतीय संस्कृती टिकवून ठेवल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जगातील अन्य संस्कृती नामशेष होत असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली. ही प्राचीन असण्यासोबतच नित्यनूतनही आहे. हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. साधू संतांनी या प्रवाहातील वाईट बाबी बाजूल्या सारल्याने संस्कृतीची निरंतरता टिकून आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानेदेखील अनेक आक्रमणांना सामोरे जात वारीची परंपरा टिकवून ठेवली. हीच परंपरा कुंभमेळ्यात प्रतिबिंबीत होते.

कुंभमेळा भारतीय अध्यात्मिक संस्कृतीचा सर्वात मोठा सोहळा आहे. मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणाचा हा सोहळा आहे. विचारांच्या प्रदूषणाला दूर सारून भारतीय संस्कृतीला प्रवाहीत करण्याचे हे पर्व आहे. या सोहळ्यात सर्व जाती-धर्माचे भाविक सहभागी होत असल्याने कुंभमेळा हा राष्ट्रीय एकात्मतेचे आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे, असेही त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यात केवळ पवित्र स्नान होत नाही, तर साधू - संतांचे मार्गदर्शन, विचारांचे आदान- प्रदान होत असल्याने पुढील वर्षी होणारा कुंभमेळा अविस्मरणीय होईल, असा विश्वास श्री.फडणवीस यांनी व्यक्त केला.

महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळे समाजातील गैरप्रकारांना आळा बसेल तसेच भोंदूगिरी करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी अविचल देवाचार्य, जितेंद्रानंद स्वामी, रवींद्रपुरी महाराज, तुषार भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आमदार ॲड. राहुल ढिकले, महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, माजी आमदार बाळासाहेब सानप, महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्यासह देशभरातून आलेले साधू, संत, महंत उपस्थित होते.

---

## बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवार जाहीर; बिनविरोध निवडणुकीची आशा मावळली?



**बारामती/वृत्तसंस्था** : विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात घडामोडींना वेग आला आहे. बारामती विधानसभेची पोटनिवडणूक बिनविरोध करण्यासाठी महायुतीकडून हालचाली सुरू आहेत. मात्र, असं असतानाच आता काँग्रेसने मोठी घोषणा केली आहे. बारामती पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसने आकाश मोरे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निर्देशानंतर बारामती पोटनिवडणुकीसाठी आकाश मोरे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती सांगण्यात येत आहे. या संदर्भातील अधिकृत घोषणा काँग्रेस रविवारी सायंकाळी केली आहे. त्यामुळे आता बारामती पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे. महायुतीने अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी दिली आहे. ही निवडणूक बिनविरोध होण्यासाठी महायुतीकडून प्रयत्न सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी उद्धव ठाकरे यांच्यासह विरोधी पक्षाच्या काही नेत्यांना संपर्क साधल्याचं सांगण्यात आलं होतं. मात्र, त्यानंतरही काँग्रेसने बारामती पोटनिवडणुकीसाठी उमेदवाराची घोषणा केल्यामुळे आता या निवडणुकीची रंगत वाढली आहे. काँग्रेसने बारामती पोटनिवडणुकीसाठी आकाश मोरे यांना उमेदवारी दिली आहे. आकाश मोरे हे वकील आहेत. तसेच त्यांचे वडील आमदार होते.

आकाश मोरे यांनी याआधी विधानसभेची निवडणूक लढवलेली आहे. बारामती पोटनिवडणुकीबाबत बोलताना जय पवार यांनी म्हटलं होतं की, "ज्येष्ठ नेते शरद पवारही ही निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. बारामतीमधील सर्व जनतेलाही ही निवडणूक बिनविरोध व्हावी असं वाटत आहे. विरोधकांना ही निवडणूक लढवायची असेल तर त्यांनी लढावी.

## बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोधच व्हावी

**पुणे/वृत्तसंस्था** : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणूक बिनविरोध झाली पाहिजे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला होता. त्यामुळे निवडणूक झालीच, तर त्यांच्या प्रचारासाठी बारामतीला जाणार आहे, अशी भूमिका केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मांडली.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही निवडणूक लढण्याचा आग्रह सोडण्याबाबत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी त्यांना तशा सूचना द्याव्या, असेही त्यांनी नमूद केले. रिपब्लिकन पक्षाची राज्य कार्यकारिणी आणि प्रमुख नेत्यांची बैठक येथे पार पडली. या बैठकीला राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरोदे, प्रदेश सरचिटणीस अविनाश महातेकर, गौतम सोनावणे, प्रदेश कार्याध्यक्ष बाबूराव कदम, राष्ट्रीय सरचिटणीस आशा लांडगे, बाळसाहेब जानराव, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, संजय सोनवणे या वेळी मान्यवर उपस्थित होते.



बारामती येथी पोटनिवडणुकीबाबत आठवले म्हणाले, बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध झाली पाहिजे. अजित पवार यांच्यासारखा मोठा नेता राज्याने गमावला आहे. त्यांच्या अपघात प्रकरणाची चौकशी सुरू आहे. मात्र, ही चौकशी सीबीआयकडे देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्री अमित शहा यांना पत्र दिले आहे. पोटनिवडणुकीबाबत सुनेत्रा पवार यांच्याशी बोलणे झाले. मात्र, निवडणूक झाल्यास त्यांच्या प्रचाराला जाणार आहे. तसेच आमचे कार्यकर्ते ही प्रचार करतील.

विधानसभेच्या निवडणुका होत असलेल्या पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या दमनशाहीचा पराभव करण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचा भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीला पूर्ण पाठिंबा राहील. बंगालमध्ये रिपब्लिकन पक्षातर्फे उमेदवार उभा करणार नाही. तर तामिळनाडूमध्ये ४०, तर आसाममध्ये ४ उमेदवार रिंगणार असतील. पुदुच्चेरी येथे भाजप, राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या उमेदवारांना पाठिंबा दिला जाणार असल्याचे आठवले यांनी सांगितले.

लोकसभेत महिलांसाठी २७३ जागा वाढवण्याबाबत आता विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. त्यात महिलांबाबतचे विधेयक मांडले जाणार आहे. त्यामुळे महिलांच्या जागांमध्ये वाढ होऊन त्या ८१६ होणार आहेत. त्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना वेगळे आरक्षण असणार आहे, अशी माहिती आठवले यांनी दिली. महिलांसाठी आरक्षित असलेल्या राखीव जागांचा लाभ इतर मागास प्रवर्ग, भटके विमुक्त प्रवर्गातील महिलांना मिळणार नाही. कारण या प्रवर्गांना अद्याप राजकीय आरक्षण दिले गेलेले नाही. मात्र, अनुसूचित जाती, जमातींप्रमाणेच इतर मागासवर्गीय आणि भटके विमुक्त यांनाही राजकीय आरक्षण मिळावे, अशी भूमिका असल्याचे आठवले यांनी स्पष्ट केले. पावसाळी अधिवेशनापूर्वी विविध महामंडळांवरील अध्यक्ष, सदस्यांच्या नियुक्त्या करण्याची मागणी आठवले यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'रिपब्लिकन'ला विधान परिषदेतील एक जागा, प्रत्येक जिल्ह्यात महामंडळाचे किमान एक सदस्यत्व आणि काही महामंडळांवर अध्यक्ष पद देण्याबाबत दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# भय इथले संपत नाही, नांदेडमध्ये गँगवॉरमध्ये 3 ठार, 24 तासांत आणखी एकाचा जीव घेतल्याची घटना

**नांदेड :** नांदेडमध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे. शुक्रवारी मध्यरात्री गँगवारमध्ये झालेल्या तिघांच्या मृत्यूची घटना चर्चेत असताना घटनेच्या 24 तासाच्या आत आणखी एका तरुणाचा धारधार शस्त्राने वार करून निर्घृणपणे खून करण्यात आला. शहरातील जुना मोंढा मुरमुरा गल्ली येथे रात्री साडे आकरा वाजेच्या सुमारास ही घटना घडली. रज्जुसिंघ उर्फ रंजितसिंघ तबेलेवाले असं मयत तरुणाच नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतल्याची माहिती आहे. 24 तासात चार जणांचा खून झाल्याने नांदेड खळबळ उडाली आहे. तर दुसरीकडे कायदा आणि सुरक्षेतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.मयत रज्जुसिंघ तबेलेवाले (वय 35) हा गुरुद्वारा परिसरातील रहिवासी आहे. शुक्रवारी रात्री मुरमुरा गल्ली भागात त्याचा धारदार शस्त्राने डोक्यावर आणि चेहऱ्यावार वार करण्यात आले. रक्तबंभाळ झालेल्या रज्जुसिंघ याचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर आरोपी फरार झाले होते. घटनेची माहिती मिळताच वजीराबाद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेच्या काही तासाच्या आत पोलिसांनी मनप्रीतसिंघ कांचवाले आणि परमज्योतसिंघ






कांचवाले या दोन भावांना ताब्यात घेतले.विशेष म्हणजे या घटनेच्या काही तासांपूर्वीच भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गँगवारातून तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. सदा गँग आणि साईलाला गँगचे सदस्य आमनेसामने भिडले. यात अर्जितसिंघ चव्हाण आणि मोहम्मद अरबाज हे दोघे जागीच ठार झाले होते. तर मयत अर्जितसिंघ चव्हाण याच्या भावाने सय्यद आवेज याचा रविष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात तीक्ष्ण हत्याराने वार करून खून केल.वर्चस्वाच्या संघर्षातून हत्याकांड घडल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे घटनेच्या 24 तासाच्या आत खुनाची दुसरी घटना घडल्याने विविध चर्चांना उधाण आलं होतं. दरम्यान या प्रकरणी वजीराबाद पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. खुनाच्या या घटनेने खळबळ उडाली असून कायदा आणि सुरक्षेतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. भाग्यनगर पोलीस ठाण्याचा हद्दीत घडलेल्या गँगवार घटनेनंतर पोलिसांनी दोन्ही गँग विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. तसेच आरोपींची धरपकड देखील सुरु केली आहे. पोलिसांनी साई लाला गँगचे शाबेर खान बशीर खान आणि सोनू कैलाश राऊत तर सदा गँगमधील नागेश उर्फ लड्डया उत्तमराव लडे, संभाजी अनंतराव क्षीरसागर, प्रदीप गजानन चव्हाण आणि गजानन वालसिंग चव्हाण आदिना ताब्यात घेतले आहे. या सहाही आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना ८ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## रात्री झोपेत साक्षीला सर्पदंश, सकाळी आई-वडिलांची रुग्णालयाकडे धाव

**बुलढाणा :** सध्या बहुतांश ठिकाणी जिल्ह्यात अवकाळी पाऊस सुरू आहे .आणि अशातच मुख्यतः ग्रामीण भागात अर्धवट ऊन दमट वातावरण सकाळी थंड वारा आणि हा सगळा प्रकार सुरू असताना मुख्यतः सापांना त्यांच्या बिळात अस्वस्थ करत असतो. ते वातावरण बदलामुळे अचानक त्याच्यातून बाहेर येत जिथे मिळेल तिथे आसरा घेत असता. आणि याचाच एक बळी ही युवती ठरली आहे.

बुलढाणा जिल्ह्यात सर्पदंशामुळे एका 19वर्षीय युवतीचा करूण अंत झाला आहे. यामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार तालुक्यातील देऊळगाव कुंडपाळ येथे ही घटना घडली आहे. ही युवती शुक्रवारी रात्री आपल्या घरात झोपली होती. त्यावेळी रात्री झोपेतच तिला विषारी सर्पदंश झाला. सर्पदंश झाल्याने या युवतीचा मृत्यू झाल्याची घटना चार एप्रिल रोजी सकाळी आठ वाजता उघडकीस आली.मृत युवती साक्षी ही रवींद्र शेषराव सानप यांची कन्या आहे. शुक्रवारी रात्री ती तिच्या आई-वडिलांशेजारी झोपलेली होती. त्याचवेळी एका विषारी सापाने तिचा चावा घेतला. पण तिला त्यावेळी काहीच त्रास झाला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी उठताच तिच्या घशात दुखू लागले. तिला काही कारणाने अस्वस्थ वाटू लागले. मुलीला ॲसिडिटी सदृश्य त्रास होत असल्यामुळे पहिलं तिच्या आई-वडिलांनी ॲसिडिटी झाली असावी असा निष्कर्ष लावला. पण त्रास वाढल्यामुळे तिला तात्काळ लोणार येथील दवाखान्यात घेऊन जाण्यात आले.लोणार येथील दवाखान्यात उपचार सुरू केले. पण त्यावेळी तिने उपचाराला फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यावेळी तपास करताच डॉक्टरांना सर्पदंशाची लक्षणे दिसू लागली. त्यामुळे साक्षीला मेहकर येथील रुग्णालायत हलवण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणेच साक्षीचे आई-वडील तिला घेऊन रुग्णालयाच्या दिशेने रवाना झाले. परंतु, रस्त्यातच तिची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे तिच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. हाच साप साक्षीच्या शेजारच्या अंगणात आढळून आल्यानंतर त्यांचा संशय खरा ठरला.कुमारी साक्षी ही केवळ 19 वर्षांची होती. ती सुलतानपूर येथील बी फार्मसी द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी होती .तिच्या निधनाची बातमी समजताच गावावर शोक काळा पसरली वैद्यकीय तपासणीनंतर शोकाकुळ वातावरणात तिला अखेरचा निरोप देण्यात आला. तिच्या

## कॉलेज जवळील लॉजवर पोलिसांचा छापा

**पुणे :** पुण्यातील शांत समजल्या जाणाऱ्या नऱ्हे गाव परिसरात एक धक्कादायक वास्तव समोर आलं, जे बाहेरून 'स्वर्ग' नावाने ओळखल्या जाणाऱ्या लॉजच्या आड सुरू होतं. झील कॉलेजजवळील "स्वर्ग एक्झिक्युटिव्ह पॅराडाईज लॉज"मध्ये सुरू असलेल्या सेक्स रॅकेटवर गुन्हे शाखेने टाकलेल्या छाप्याने या भागात खळबळ उडाली आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाला काही दिवसांपासून या लॉजबाबत संशयास्पद हालचालींची माहिती मिळत होती. या ठिकाणी महिलांकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी अत्यंत शिताफीने कारवाईची योजना आखली.

पोलिसांनी प्रथम बनावट ग्राहक पाठवून माहितीची खात्री केली. व्यवहार निश्चित झाल्यानंतर सिग्नल मिळताच पथकाने अचानक लॉजवर धाड टाकली. या वेळी आत सुरू असलेला घाणेरडा प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी तत्काळ चार महिलांची सुटका करत त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवले. या प्रकरणात तीन जणांना ताब्यात घेण्यात आले आहे.

## चारित्र्याच्या संशयातून वाद, तरुणाने २० वर्षीय पत्नीला दगडाने ठेचून संपवलं

**रायगड :** चारित्र्याच्या संशयावरून पतीने आपल्या पत्नीचा दगडाने ठेचून खून केल्याची धक्कादायक घटना रायगड जिल्ह्यातील देवभूमी असलेल्या श्रीवर्धन तालुक्यातील दिघी इथं घडली आहे. या हत्येप्रकरणी दिघी सागरी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे. याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, दिघी गावाच्या हद्दीतील नवगरे जंगल परिसरात आंबा बागायतीत राखणदार म्हणून काम करणारे किरण परशुराम वाघमारे (वय २५) आणि त्यांची पत्नी अनिता किरण वाघमारे (वय २०, दोघेही मूळ रा. सायगाव, वावडूंगी पोस्ट शिघे, ता. मुरुड, जि. रायगड) यांच्यामध्ये क्षुल्लक कारणांवरून सतत वाद होत असत. अनेकदा पती किरण हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असे, तसेच तो तिला मारहाण करत असल्याची माहिती समोर आली आहे.अशातच १ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ३ वाजताच्या सुमारास पती-पत्नीमध्ये पुन्हा वाद झाला. या वादाच्या भरात किरण वाघमारे याने अनिताच्या कानावर, गालावर व डोक्यावर दगडाने जोरदार वार करत तिला गंभीर जखमी केले. अनिता रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. घटनेची माहिती मिळताच आंबा बागायत



मालक जलील अहमद जैद यांनी तत्काळ तिला रुग्णालयात दाखल केले. मात्र, अतिरक्तस्राव झाल्याने उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.दरम्यान, आपल्या पत्नीला ठार केल्यानंतर आरोपी पती पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. मात्र दिघी सागरी पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन अटक केली. या प्रकरणी त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०३ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अर्षद शेख करीत आहेत.

## पुण्यात स्मशान काली मंदिर परिसरात थरार; तीन भावंडांना बेदम मारहाण

**पुणे :** पुण्यातील स्मशान काली मंदिर परिसरात दर्शनासाठी आलेल्या भावंडांवर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी कानिफनाथ विष्णू नायडू (वय ५१, रा. काशेवाडी, भवानी पेठ, पुणे) हे ३ एप्रिल रोजी सकाळी सुमारे ९.३० वाजता आपल्या दोन भावांसह मंदिरात दर्शनासाठी आले होते.त्यावेळी आरोपी आतिफ, अझीम सलीम शेख उर्फ चोर, गौरव गुजर, पियूष परदेशी, रेहान उर्फ भैया तसेच इतर साथीदारांनी त्यांना अडवले.जुन्या पैशांच्या व्यवहारावरून आरोपींनी फिर्यादीशी वाद घातला. वाद वाढत जाऊन त्याचे रूपांतर




मारहाणीमध्ये झाले. आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी हत्याराने वार केला. तसेच पिस्तूल दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली.फिर्यादीला वाचवण्यासाठी पुढे आलेल्या त्यांच्या दोन्ही भावांनाही आरोपींनी बेदम मारहाण केली. लाथाबुक्क्यांसह हत्यारांचा वापर करून तिघांनाही गंभीर जखमी करण्यात आले. घटनेनंतर स्थानिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकरणी स्वारगेट पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी गौरव गुजर आणि रेहान उर्फ खिश्या यांना अटक केली आहे. इतर आरोपींचा शोध सुरू असून पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात उसने पैसे परत मागितल्याचा राग मनात धरून हा वाद उद्भवल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.पुण्यात याआधीदेखील हाणामारीची घटना समोर आली होती. औंध परिसरातील इंदिरा गांधी वसाहतीत झालेल्या एका सार्वजनिक कार्यक्रमात डान्स करताना झालेल्या किरकोळ धक्काबुक्कीने अचानक हिंसक वळण घेतल्याची घटना समोर आली होती. या घटनेत चार जण जखमी झाले असून पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १ एप्रिल रोजी परिसरात संगीत आणि नृत्याचा कार्यक्रम सुरू होता. यावेळी फिर्यादीच्या वडिलांचा नाचताना आरोपींपैकी एकाला नकळत धक्का लागला. या छोट्याशा कारणावरून दोन्ही बाजूंमध्ये आधी शाब्दिक वाद झाला. मात्र काही क्षणांतच हा वाद चिघळला आणि आरोपींनी फिर्यादीच्या वडिलांवर हल्ला केल्याचा आरोप आहे. हा प्रकार पाहून फिर्यादी कुणाल तुजारे (२२) आणि त्याचा पुतण्या यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. "का मारहाण करताय?" असा जाब विचारताच आरोपी अधिकच आक्रमक झाले. त्यांनी दोघांवरही हल्ला केल्याने परिस्थिती आणखी बिघडली. या झटापटीत एकूण चार जण जखमी झाले. घटनेनंतर जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पंतचे झुंझार अर्धशतक; अटीतटीच्या मॅचमध्ये लखनौने मारली बाजी; घरच्या मैदानावर हैदराबादला झटका



**हैदराबाद/वृत्तसंस्था :** रविवारी डबल धमाका रंगतोयय. आयपीएलचा पहिला थरार हा सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायट्ंसमध्ये रंगला. या सामन्याचे नाणेफेक हे लखनौने जिंकले आणि प्रथम बॉलिंग करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादला फक्त 156 धावा केल्या तर लखनौला लक्ष्याची प्राप्ती करताना 160 धावा करता आल्या आणि सामना 5 विकेट्सने जिंकला. लखनौ सुपर जायंट्सने आयपीएल 2026 मध्ये आपले खाते उघडले आहे. ऋषभ पंतच्या नेतृत्वाखाली, लखनौने आपल्या दुसऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादला 5 गडी राखून पराभूत करत या हंगामातील आपला पहिला विजय नोंदवला. घरच्या मैदानावर कमी धावसंख्येचा सामना गमावल्यानंतर, लखनौने हैदराबादला त्यांच्याच मैदानावर पराभूत केले. मोहम्मद शमीच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर सनरायझर्स हैदराबादला 156 धावांवर रोखल्यानंतर, कर्णधार ऋषभ पंतच्या झुंजार अर्धशतकाच्या जोरावर लखनौने शेवटच्या षटकात लक्ष्य गाठले.

रविवार, 5 एप्रिल रोजी हैदराबादमधील राजीव गांधी स्टेडियमवर झालेल्या दुहेरी सामन्यातील पहिल्या सामन्यात लखनौने आपल्या उत्कृष्ट गोलंदाजीच्या जोरावर हा विजय मिळवला. पहिल्या सामन्याप्रमाणेच, लखनौच्या वेगवान गोलंदाजांनी पुन्हा एकदा सुरुवातीच्या षटकांमध्ये फलंदाजी करणाऱ्या संघाला बॅकफूटवर ढकलले. मोहम्मद शमीने पुन्हा एकदा लखनौच्या गोलंदाजी आक्रमणाचा कणा असल्याचे सिद्ध केले आणि हैदराबादचे दोन्ही स्फोटक सलामीवीर, अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेड यांना अवघ्या सात चेंडूंमध्ये बाद केले. शमीने सलग चार षटके टाकून केवळ नऊ धावांत दोन बळी घेतले.शमी व्यतिरिक्त, युवा वेगवान गोलंदाज प्रिन्स यादव आणि फिरकी गोलंदाज मणिकरण सिद्धार्थ यांनीही हैदराबादच्या स्फोटक फलंदाजीला रोखून धरले, ज्यामुळे संघाने केवळ 26 धावांत चार गडी गमावले. पहिल्या दहा षटकांत एसआरएचची धावसंख्या केवळ 35 धावा होती. हेनरिक क्लासेन आणि नितीश कुमार रेड्डी यांनी डाव सावरला आणि प्रतिहल्ला चढवला. त्या दोघांनी शानदार अर्धशतके झळकावली आणि 116 धावांची भागीदारी रचली. मात्र, हैदराबादला शेवटच्या दोन षटकांत चार गडी गमावून केवळ 12 धावा करता आल्या, ज्याची त्यांना मोठी किंमत मोजावी लागली.

## गुजरातचा पराभव पण 23 वर्षांच्या अशोकने फेकला आयपीएलमधील सर्वात वेगवान चेंडू

**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धेत राजस्थान रॉयल्स संघाने गुजरात टायटन्स संघावर सहा धावांनी रोमहर्षक विजय मिळवला. यशस्वी जयस्वाल आणि ध्रुव जुरेलच्या आक्रमक अर्धशतकानंतर रवी बिश्नोईच्या अचूक फिरकीने सामना फिरला. त्यासोबतच 'राजस्थान'च्या जोफ्रा आर्चर आणि तुषार देशपांडे यांनी अखेरच्या दोन षटकांत लढतीचे चित्र पालटले. त्यामुळे कर्णधार रशीद खान आणि कॅगिसो रबाडाची मेहनत व्यर्थ ठरली. गुजरातने हा सामना हरला मात्र त्यांचा युवा खेळाडू गोलंदाज अशोक शर्मा याने इतिहासच रचला. अशोकने यंदाच्या मोसमातील सर्वात वेगवान चेंडू फेकला. आयपीएलच्या इतिहासामध्ये वेगवान चेंडू टाकण्याच्या यादीमध्ये त्याचा समावेश आहे. याआधीही दोन युवा गोलंदाजांनी हा विक्रम केला होता.अशोक शर्मा याने १६ ओव्हरमधील शेवटचा चेंडू तब्बल १५४.३ किमी/ता ने टाकला. त्यावेळी राजस्थान संघाचा ध्रुव जुरेल हा बॅटिंग करत होता, तो चेंडू निर्धाव गेला. याआधी उमरान मलिक आणि मयंक यादव यांनी ही कामगिरी केली होती. उमरान २०२२ मध्ये सनरायजर्स हैदराबादकडून खेळताना दिल्ली कॅपिटल्सविरोधात १५७ किमी/ता ने चेंडू टाकला होता.नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये ही लढत झाली. राजस्थान संघाने प्रथम फलंदाजी करताना ६ बाद २१० धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल गुजरात संघाला ८ बाद २०४ धावाच करता आल्या. लक्ष्याचा पाठलाग करताना साई सुदर्शन आणि



कुमार कुशाग्रने ८ षटकांत ७८ धावांची सलामी दिली. कुमार बाद झाल्यानंतर साईने दहाव्या षटकात 'गुजरात'च्या शंभर धावा फलकावर लावल्या, मात्र, साई अर्धशतकाचे शतकात रूपांतर करू शकला नाही. रवी बिश्नोईला मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो माघारी परतला. साईने ४४ चेंडूत नऊ चौकार व तीन षटकारांसह ७३ धावा केल्या. यानंतर बिश्नोईने ग्लेन फिलिप्स, वॉशिंग्टन सुंदर, राहुल तेवतिया यांनाही बाद केले. २ बाद १२७ वरून 'गुजरात'ची ७ बाद १६१ अशी स्थिती झाली. गुजरात'ला अखेरच्या ३० चेंडूंत ५० धावांची गरज होती. शुभमन गिलच्या अनुपस्थितीत कर्णधार असलेल्या रशीद खानने रबाडाच्या साथीत डावाची सूत्रे हाती घेतली. या जोडीने जोफ्रा आर्चर, बिश्नोई, संदीप शर्मा यांच्यावर हल्ला चढविला. अखेरच्या १२ चेंडूंत १५ धावांची गरज असताना आर्चरने केवळ चार धावा दिल्या. त्यामुळे पारडे 'राजस्थान' च्या बाजूने झुकले. आता अखेरच्या चेंडूंत ११ धावांची गरज असताना तुषार देशपांडेने चार चेंडूंत चारच धावा दिल्या. यानंतर पाचव्या चेंडूवर रशीद खानला बाद केले आणि अखेरच्या चेंडूवर विजयही मिळवून दिला.

## राशिदने एकट्या खेळाडूला जबाबदार धरलं; मॅचनंतर मनातलं सगळं बोलला

**अहमदाबाद/वृत्तसंस्था :** आयपीएल 2026 च्या नवव्या सामन्यात, राजस्थान रॉयल्सने एका रोमांचक लढतीत गुजरात टायटन्सचा 6 धावांनी पराभव केला.



अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, राजस्थानने प्रथम फलंदाजी करत 20 षटकांत 6 गडी गमावून 210 धावा केल्या. विजयासाठी 211 धावांचे लक्ष्य असताना, गुजरात टायटन्स 20 षटकांत 8 गडी गमावून केवळ 204 धावाच करू शकले.रशीद खान म्हणाला की, "आम्ही चांगली गोलंदाजी केली आणि प्रतिस्पर्धी संघाला 210 धावांवर रोखले. आमची सुरुवात चांगली झाली होती, पण 10 व्या षटकानंतर सतत विकेट पडल्याने सगळा जोर निघून गेला. अशा खेळपट्टीवर प्रति षटक 9 किंवा 10 धावा करणे ही मोठी गोष्ट नव्हती; कमी वेळात सतत विकेट पडल्यामुळे हा पराभव झालामधल्या फळीतील समस्यांबद्दल बोलताना रशीद म्हणाला की, "प्रत्येकाचा स्वतःचा दृष्टिकोन असतो आणि ते आपल्या चुकांमधून शिकून पुढच्या सामन्यात अधिक मजबूत होऊन परतण्याचा प्रयत्न करतात." शेवटच्या षटकाबद्दल बोलताना रशीद म्हणाला की, "कागिसो रबाडासोबत त्याचे संभाषण दडपण कमी करण्यासाठी चौकार मारण्याबद्दल होते; पण त्याने तुषार देशपांडेच्या गोलंदाजीचे कौतुक केले आणि म्हणाला की, त्याने फक्त एकच खराब चेंडू टाकला, जो रशीदच्या मते त्याने स्वतःच चौकार मारायला हवा होता." म्हणजे राशिदने यासाठी स्वत:ला जबाबदार ठरवल्याचे दिसत आहेसामन्यातील सर्वात रोमांचक क्षण शेवटच्या दोन षटकांमध्ये आला, जेव्हा गुजरात टायटन्स विजयाच्या उंबरठ्यावर होते. 18 षटकांनंतर गुजरातची स्थिती मजबूत होती, परंतु राजस्थान रॉयल्सच्या गोलंदाजांनी निर्णायक क्षणी प्रभावी गोलंदाजी केली. गुजरातला शेवटच्या दोन षटकांत 15 धावांची गरज होती.

## मुंबई इंडियन्सला पराभवानंतर पॉइंट टेबलमध्येही झटका



**मुंबई/वृत्तसंस्था :** आयपीएलमध्ये शनिवारी डबल हेडर सामन्यांनंतर पॉइंट टेबलमध्ये मोठा बदल पाहायला मिळाला आहे. दिल्ली कॅपिटल्स संघाने मुंबई इंडियन्सचा पराभव केला. तर संध्याकाळी झालेल्या गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात राजस्थानने विजय मिळवला. या दोन सामन्यांच्या निकालानंत पॉइंट टेबलमध्ये कोण कितव्या स्थानी हे जाणून घ्या. शनिवारी मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात झालेल्या सामन्यात राजधानीवाल्यांनी विजय मिळवत आपली विजयी घौडदौड कायम ठेवली. मुंबईवर सह विकेटने त्यांनी विजय मिळवला. दोन सामने जिंकल्यामुळे दिल्ली पॉइंट टेबलमध्ये चार गुणांसह टॉपला गेली होती. मात्र त्यानतंर राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात झालेल्या अटीतटीच्या सामन्यात रॉयल्सने विजय मिळवला. या सामन्यातील विजयानंतर पुन्हा एकदा पॉइंट टेबलमध्ये बदल झाल्याचं पाहायला मिळालं. या सामन्यात विजय मिळवल्याने राजस्थानचा संघ टॉपला गेला. आता पॉइंट टेबल पाहिले तर राजस्थान रॉयल्स, दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज या तिन्ही संघाचे गुण ४ आहेत. फक्त रनरेटमुळे राजस्थानचा संघ टॉपला गेला आहेमुंबई इंडियन्स संघाला पराभवाचा झटका बसला. ते थेट सहाव्या नंबरल गेले आहेत. पॉइंट टेबल आता पाहिले तर पहिल्या स्थानी राजस्थान रॉयल्स ४ गुण +२.२३३, दुसऱ्या स्थानी दिल्ली कॅपिटल्स ४ गुण +१.१७०, तिसऱ्या स्थानी पंजाब किंग्ज ४ गुण +०.६३७, चौथ्या स्थानी आरसीबी दोन गुण +२.९०७, पाचव्या स्थानी सनरायजर्स हैदराबाद २ गुण +०.४६९ आणि सहाव्या क्रमांकावर मुंबई इंडियन्स दोन सामने एक विजय २ गुण -०.२०६ आहे.दरम्यान, आजच्या सामन्यात आरसीबीने चेन्नईचा पराभव केला तर थेट पहिल्या क्रमांकावर जाण्याची संधी आहे. कारण पॉइंट टेबलमध्ये आरसीबीची रनरेट सर्वापिक्षा चांगला आहे.

सीएसके जिंकल्यावर विजयाचे खाते उघडेल. तर आजच्या होणाऱ्या पहिल्या सामन्यात लखनौ संघाला पहिला विजय मिळवायचा आहे. तर हैदराबादने एक विजय मिळवला आहे. आजचा सामना जिंकला तर ते थेट दुसऱ्या स्थानी पोहोचू शकतात.

# खचाखच भरलेला मंडप पाहून स्वत:च्या लग्नात नीतू सिंग यांना आलेली चक्कर, करिश्मा करत होती धडपड

बॉलिवूड अभिनेत्री करिश्मा कपूर नुकतीच 'इंडियन आयडल 16' या रिॲलिटी शोमध्ये पाहुणी म्हणून गेली होती. यावेळी करिश्मा कपूरने अभिनेते ऋषी कपूर आणि नीतू कपूर यांच्या लग्नाचा एक किस्सा सांगितला. करिश्माने सांगितले की लग्नाच्या दिवशी नववधू असलेल्या नीतू कपूर बेशुद्ध पडल्या होत्या.नीतू कपूर यांच्याबद्दल बोलताना करिश्मा म्हणाली, "त्यांचा छोटासा डबा (tiffin box) नेहमीच त्यांच्यासोबत असतो, त्या कुठेही गेल्या तरी तो त्यांच्यासोबत असतोच. त्या बिर्याणीही खात नाहीत. आम्ही नेहमीच त्यावरून त्यांची चेष्टा करतो; पण जेव्हा जेव्हा फिटनेसचा विषय निघतो, तेव्हा आम्ही त्यांच्याकडेच प्रेरणा म्हणून पाहतो. या वयातही त्या किती शिस्तबद्ध राहतात, हे तुम्हीच पहा. आमच्या कुटुंबाचे एक वैशिष्ट्य आहे. ते म्हणजे कपूर घराण्यातील प्रत्येकालाच खायला खूप आवडते आणि तेही अगदी मनसोक्त! मात्र, नीतू आंटी या सर्वापेक्षा पूर्णपणे वेगळ्या आहेत. आपल्या आहाराबाबत त्या नेहमी अत्यंत काटेकोर असतातकरिश्माने पुढे सांगितले, "मी तुम्हाला एक खास किस्सा सांगू इच्छिते: चिंटू अंकल





आणि नीतू आंटी यांच्या लग्नाला उपस्थित राहण्याचं भाग्य मला लाभलं, हे मी माझं सुदैव मानते. नवरीच्या (नीतू आंटींच्या) अगदी शेजारीच बसायला मिळावं, यासाठी मी खूप धडपड करत होते. मला आठवतंय की, त्या लग्नाला अनेक दिग्गज स्टार्स उपस्थित होते. त्या दिवसाशी संबंधित आणखी एक रंजक किस्साही आहे. त्या असंख्य स्टार्सच्या गर्दीत आणि लोकांच्या प्रचंड घोळक्यात, लग्नाचे विधी सुरू असतानाच नीतू आंटी अचानक बेशुद्ध पडल्या होत्या. त्यामुळे त्यांना काय झालं या चिंतेत तिथे उपस्थित सर्वजण खूपच घाबरले होते.त्यावेळी मी खूपच लहान होते. मला प्रचंड आनंद झाला होता, कारण ते आमच्याच कुटुंबातील लग्न होतं आणि मला इतक्या साऱ्या कलाकारांना प्रत्यक्ष पाहता आलं होतं. माझ्याच कुटुंबात इतके दिग्गज कलाकार आहेत की, मी त्या प्रत्येकाचीच एक मोठी चाहती आहे. तरीही, मला असं मनापासून वाटतं की, नीतू आंटींचं स्थान मात्र काहीसं वेगळं आणि खास आहे; त्यांच्या अंगी असलेला तो उत्साह, त्यांचं संपूर्ण व्यक्तिमत्त्व आणि त्यांची ती खास व्हाइब खरोखरच अद्वितीय होती."करिश्मा कपूर आणि कोरिओग्राफर गीता कपूर या दोघी या कार्यक्रमात (शोमध्ये) विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. हा इंडियन आयडल 16 चा 'सुवर्ण महोत्सवी' (Golden Jubilee) भाग होता. या भागाची सध्या सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे; तसेच, या कार्यक्रमात करिश्माने केलेला लूक देखील प्रेक्षकांच्या प्रचंड पसंतीस उतरला असून प्रेश्रक त्याचे कौतुक करत आहेत.

## प्रसाद ओकसोबत रोमँटिक सीन्स, श्वेता शिंदे म्हणाली, 'दोघांसाठी खूप मोठं चॅलेंज, माझ्या आईला डिप्रेशन यायचं'

मराठी अभिनेत्री श्वेता शिंदे आता मालिकांमध्ये काम करत नसली तरी ती निर्माती झाली आहे. श्वेतानं, 'लगीर झालं जी', 'देवमाणूस', 'तारिणी' यांसारख्या मालिकांची निर्मिती केली आहे. श्वेता शिंदेची 'अवघाची संसार' हीमालिका प्रचंड गाजली. या मालिकेत तिच्यासोबत प्रसाद ओकसुद्धा मुख्य भूमिकेत होता. या मालिकेत श्वेताची खलनायिकेची भूमिका होती. मालिकेत श्वेता आणि प्रसाद यांचा रोमँटिक सीनही होते. अशातच आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये श्वेताने या रोमँटिक सीन्सबद्दल भाष्य केलं आहे.श्वेता शिंदेनं नुकतीच भार्गवी चिरमुलेच्या पॉडकास्टला हजेरी लावलेली. या मुलाखतीदरम्यान 'अवघाची संसार' मालिकेतील रोमँटिक सीन्सबद्दल बोलताना श्वेता म्हणाली की, 'बापरे, प्रसाद आणि मी! म्हणजे एवढे हॉट आणि स्टीमी सीन्स टेलिव्हिजनवर तेही त्या वेळेला, पहिल्यांदाच. ह्याचं श्रेय दोन पुरुषांना द्यावंसं वाटतं. एक आहे प्रसाद ओक आणि दुसरे आहेत मंदार देवस्थळी. कारण तो डायरेक्टर होता आणि हा ॲक्टर होता. मला असं वाटतं की, ही दोन माणसं जोपर्यंत तुम्हाला कम्फर्टेबल करत नाहीत, तोपर्यंत तसे सीन्स होणे नाही. त्यामुळे माझ्यासाठी आणि प्रसादसाठी ते खूप मोठं चॅलेंज असायचं.'श्वेता पुढे म्हणाली, 'एवढीशीच जागा आहे. त्याच्यात असंच उभं



राहायचं आहे. मला आठवतंय, एक एवढुसा कोपरा होता आणि त्याच्यामध्ये आम्ही उभे राहायचो, कारण जागाच नव्हती. काय करायचं. सगळा स्ट्रगल होता. पण लोकांना वाटायचं काय चाललं असेल ह्यांच्यामध्ये. पण हे कुणालाच कळत नाही ना की, खरा स्ट्रगल तर वेगळाच होता. माझ्या आईला तर डिप्रेशन यायचं माझे तसले सीन बघून, की बापरे आता लोकांना काय वाटेल. हिच्याशी लग्न कोण करेल? आई म्हणायची अगं मला बघवत नाहीये. अजिबात आणि नको तू असं करुस वगैरे, असं माझ्या आईचं होत होतं. पण आम्ही ते सीन्स एन्जॉय केले. खूप छान पद्धतीने केले. ते ब्लाउज आणि ते प्लेन साड्यांची फॅशन मी आणली होती.मराठी प्रेक्षकही असे सीन पाहतात. त्यांना काही वेगळं नाही वाटत आणि मराठीतच असे सीन होतात असं नाहीये. हाच प्रेक्षक हॉलिवूडचे सिनेमेही पाहतो आणि मला कधी असा अनुभव नाही आला आणि पूर्वीच्या मालिकांमध्ये असे सीन व्हायचे.

## मालिकेतून अभिनेत्रीची एक्झिट, म्हणाली, 'लवकरच नवीन काहीतरी घेऊन येणार'

लग्नानंतर होईलच प्रेम ' ही मालिका लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. या मालिकेत मृणाल दुसानिसनं नंदिनीची भूमिका साकारली असून विवेक सांगळेनं जीवाची भूमिका साकारली आहे. त्याचबरोबर विवेक आंदळकरने पार्थची तर ज्ञानदानं काव्याची भूमिका साकारली आहे. तसेच या मालिकेत ऋजुता देशमुख आणि अविनाश नारकर यांच्याही महत्वपूर्ण भूमिका आहेत. अशातच आता 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेतील एका अभिनेत्रीनं प्रेक्षकांचा निरोप घेतला आहे. त्याबद्दल अभिनेत्रीनं सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत सांगितलंय. लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेमध्ये अभिनेत्री शिवानी बनेनं काव्याच्या मैत्रिणीची म्हणजेच अनिशाची भूमिका साकारलेली. मालिकेमध्ये काव्या आणि पार्थ अनिशाला लाडाने 'खारुताई' असं म्हणायचे. आता अनिशाने म्हणजेच शिवानीनं मालिकेतून प्रेक्षकांचा निरोप घेतलाय. अनिशानं सोशल मीडियावर पोस्ट करत लिहिलं की, "'खारुताईचा" सुंदर आणि सुखकर प्रवास संपवावा लागला मला. 'लग्नानंतर होईलच प्रेम' ह्या मालिकेत "अनिशा" ही भूमिका मी साकारली आणि तुमचं प्रेम मला मिळालं.तुमच्या प्रत्येकाच्या आयुष्यात अनिशा असावी अशी माझी ही इच्छा आहे आणि नसेल तर ती नक्कीच मिळेल! आमच्या संपूर्ण टीमला आणि फॅनपेजना धन्यवाद...तुमच्यामुळे माझा हा १ वर्षाचा प्रवास खूप छान झाला.

***

# केवळ 4 सिनेमांनीच कमावलेले 3800 कोटी



साऊथकडील सिनेमांपासून ते बॉलिवूडपर्यंत आपल्या सौंदर्य आणि अभिनयाने सर्वत्र दबदबा निर्माण करणारी रश्मिका मंदान्ना आताच्या काळातील सर्वाधिक मागणी असलेली अभिनेत्री आहे. 5 जानेवारी 2026 रोजी रश्मिका तिचा 30 वा वाढदिवस साजरा करत आहे. विशेष म्हणजे विजय देवराकोंडाशी लग्नानंतरचा हा पहिलाच वाढदिवस असल्यामुळे तिच्यासाठी हा दिवस खूप खास असेल.अवघ्या दहा वर्षांच्या तुलनेने अल्पशा कारकिर्दीतच, रश्मिकाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही स्तरांवर स्वतःची एक वेगळी आणि महत्त्वपूर्ण ओळख निर्माण केली आहे. 2016 मध्ये 'किरिक पार्टी' या कन्नड चित्रपटाद्वारे आपल्या अभिनयाच्या प्रवासाची सुरुवात करणाऱ्या रश्मिकाकडे आज अमाप संपत्ती आणि प्रसिद्धी दोन्ही गोष्टी आहेत.रश्मिका मंदान्नाने वयाच्या विसाव्या वर्षी आपल्या फिल्मी कारकिर्दीला सुरुवात केली. रश्मिकाने साऊथ फिल्म इंडस्ट्रीतून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली पण हिंदीतही तिला प्रचंड लोकप्रियता मिळाली. आज आपण या सुंदर अभिनेत्रीच्या एकूण संपत्तीचा (Net Worth) आढावा घेणार आहोत. आपल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत रश्मिकाने नेमकी किती कोटींची संपत्ती कमावली आहे, हे आपण आता जाणून घेऊया. रश्मिका मंदान्नाचा जन्म 5 एप्रिल 1996 रोजी कर्नाटकातील विराजपेट येथे झाला. रश्मिका आता 30 वर्षांची झाली आहे; मात्र, अगदी लहान वयातच तिने यशाला गवसणी घातली. आपल्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या टप्प्यात, रश्मिका एका चित्रपटासाठी 3 ते 5 कोटी रुपये मानधन आकारत असे; मात्र, सिकंदर या चित्रपटासाठी तिने 13 कोटी रुपयांचे मानधन घेतले. दरम्यान, पुष्पा २ या चित्रपटासाठी या अभिनेत्रीने 11 ते 12 कोटी रुपये मानधन घेतल्याचे बोलले जात आहे. प्रसारमाध्यमांतील वृत्तांनुसार, रश्मिकाकडे 66 कोटी रुपयांची मालमत्ता आहे.रश्मिकाने अनेक चित्रपटांमध्ये काम केले आहे; पण तिला काही नेमक्या सिनेमांमधून अधिक प्रसिद्धी मिळाली. 2021 मधील पुष्पा या चित्रपटातून तिने 'श्रीवल्ली' हे पात्र साकारले होते. या चित्रपटाने जगभरात प्रचंड कमाई केली. त्यानंतर, 2023 मध्ये, रणबीर कपूरसोबत ॲनिमल या चित्रपटात काम करून तिने प्रचंड लोकप्रियता मिळवली; या चित्रपटाने जागतिक स्तरावर 920 कोटींचा गल्ला जमवला. पुष्पा नंतर, पुष्पा 2 हा चित्रपट एक प्रचंड यशस्वी (ब्लॉकबस्टर) चित्रपट ठरला; अल्लू अर्जुन आणि रश्मिका यांची मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाने 1785 कोटींची कमाई केली.रश्मिका विकी कौशलसोबत छावा या चित्रपटात दिसली. छावा या चित्रपटाने भारतातच 600 कोटी आणि जगभरात 900 कोटींहून अधिक कमाई केली आहे. आता लवकरच रश्मिका शाहिद कपूरसह कॉकटेल 2 मध्ये दिसणार आहे.रश्मिकाच्या मालकीचा बंगलूरूमध्ये सुमारे 8 कोटी रुपयांचा एक मोठा बंगला आहे. याव्यतिरिक्त, मुंबई, गोवा, कूर्ग आणि हैदराबाद येथेही तिची मालमत्ता आहे. तिच्या कार कलेक्शनमध्ये ऑडी Q3, रेंज रोव्हर स्पोर्ट, टोयोटा इनोव्हा, ह्युंदाई क्रेटा आणि मर्सिडीज-बेंझ C-Class यांसारख्या वाहनांचा समावेश आहे.

रश्मिका मंदान्नाचा यापूर्वी तिच्या 'किरिक पार्टी' (Kirik Party) चित्रपटातील सहकलाकार रक्षित शेट्टी याच्याशी साखरपुडा झाला होता; मात्र, परस्पर मतभेदांमुळे या जोडीने सप्टेंबर 2018 मध्ये आपला साखरपुडा मोडला. त्यानंतर फेब्रुवारी 2026 मध्ये तिने विजय देवराकोंडासह लग्न केले.पहिल्या बायकोला घटस्फोट दिल्यानंतर अभिनेत्याने दुसरा संसार थाटला. 2003 मध्ये रोनित याने अभिनेत्री आणि मॉडेल नीलम सिंग हिच्यासोबत लग्न केलं. रोनित आणि नीलम यांना एक मुलगा आणि एक मुलगी देखील आहे. दुसऱ्या कुटुंबासोबत अभिनेता आज आनंदी आयुष्य जगत आहे. तर अभिनेत्याची पहिली पत्नी मुलगी ओना हिच्यासोबत राहत आहे.

# नवनवीन उपक्रमांनी विद्यार्थिनींना व महिलांना सक्षम बनविण्याचे महाविद्यालयाचे ध्येय मा. श्रद्धा ताई प्रशांत बोबडे

जनसंचलन/ खामगाव

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगाव द्वारा संचालित, गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथील गृह अर्थशास्त्र विभाग व आरोग्य, स्वच्छता समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ङ्कऑनलाइन फेस योगाफ्र कार्यशाळेचे उद्घाटन दि. २१ मार्च रोजी उत्साहात पार पडले. ही कार्यशाळा दि. २१ ते २६ मार्च या कालावधीत झूम मीटिंगद्वारे आयोजित करण्यात येत आहे.कार्यक्रमाचे उद्घाटन मा. सौ. श्रद्धाताई प्रशांत बोबडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, आजच्या धावपळीच्या जीवनात महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. फेस योगा हा केवळ सौंदर्यासाठी नसून मानसिक तणाव कमी करण्यासाठी उपयुक्त आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास वाढून त्या अधिक सक्षम बनतात, असे त्यांनी प्रतिपादन केले. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, निरोगी मन आणि सुदृढ शरीर हे यशस्वी जीवनाचे आधारस्तंभ आहेत. महिलांनी स्वतः च्या आरोग्याबरोबरच सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास जोपासणे आवश्यक आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले. तसेच महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नवनवीन उपक्रम राबवत असून, शिक्षणासोबतच आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि कौशल्यविकास यांवर विशेष भर देत आहे. विद्यार्थिनींना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आणि त्यांच्या उज्वल भविष्यासाठी महाविद्यालय सदैव प्रयत्नशील आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. एस. तळवणकर होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा कार्यशाळांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच शिक्षणासोबत आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकास यांनाही तितकेच महत्त्व देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रमुख उपस्थिती म्हणून आहार तज्ञ दीपाली वाघ यांनी विद्यार्थिनींना संतुलित आहाराचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी सांगितले की, योग्य आहार हा निरोगी त्वचा आणि सुदृढ शरीरासाठी अत्यंत आवश्यक आहे. तसेच फास्ट फूडच्या वाढत्या वापरामुळे होणारे दुष्परिणाम टाळण्यासाठी पारंपरिक व पौष्टिक आहाराचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेस योगा तज्ञ डॉ. गुलबक्षी मोहोकार यांचे मार्गदर्शन लाभत आहे. त्यांनी फेस योगाचे विविध प्रकार प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितले. नियमित सरावामुळे चेहऱ्यावरील स्नायू बळकट होऊन त्वचेची लवचिकता टिकून राहते तसेच नैसर्गिक सौंदर्य खुलून येते, असे त्यांनी सांगितले. या कार्यशाळेमध्ये फेस योगाचे महत्त्व स्पष्ट करताना नियमित फेस योगामुळे त्वचा ताजीतवानी राहते, चेहऱ्यावरील ताण कमी होतो व मानसिक शांतता लाभते, अशी माहिती विद्यार्थिनींना देण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नीता बोचे यांनी केले, तर प्रा. कोमल ह. काळे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. खेडेकर, प्रा. खंदारे, प्रा. वर्षा कोकाटे, प्रा. ज्योति शर्मा, स्वाती खैडके तसेच विभागातील विद्यार्थिनींनी परिश्रम घेतले. या कार्यशाळेस विद्यार्थिनी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, अशा उपक्रमांमुळे आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास निश्चितच मदत होणार आहे.अशी माहिती महाविद्यालयाचे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

## देऊळगाव माळी येथे गुरु शिष्य जयंती निमित्त शांतता समितीची बैठक संपन्न.

जनसंचलन/ मेहकर

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी क्रांतीसुर्य तात्यासाहेब महात्मा ज्योतिबा फ ुले यांची ११एप्रिल ला जयंती व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १४ एप्रिल ला जयंती या गुरु शिष्य जयंतीच्या निमित्ताने ११एप्रिल ते १४ एप्रिल समता पर्व म्हणून देऊळगाव माळी येथे साजरी करण्यात येत असते. कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी या निमित्ताने श्री संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात मेहकर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार आलेवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शांतता समितीची बैठक संपन्न झाली .या बैठकीला सावता माळी मंदिर समितीचे अध्यक्ष बी. के.सुरुशे, अश्रू मगर, भिकाजी मगर, भास्कर गवई, देऊळगाव माळी बीटचे बीट जमादार गव्हाने,मेहकर पोलीस स्टेशनचे परसुवाले साहेब, पोलीस पाटील गजानन चाळगे तसेच सर्व जाती-धर्माचे लोक उपस्थित होते. सदरील बैठकीची प्रस्तावना व सूत्रसंचालन राजेश मगर, व गजेंद्र गवई यांनी केली. आपण उत्सव साजरे करत असताना कायदा व सुव्यवस्थेच्या चौकटीत तसेच शांततेत साजरे करण्याचे आवाहन मेहकर पोलीस स्टेशनचे ठाणेदार आलेवार यांनी केले. तसेच काही मार्गदर्शक सूचना सुद्धा यावेळी त्यांनी दिल्या.





आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| गुंतवणुक रक्कम | | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा... सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षांपर्यंत

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मार्च एंडनंतर विश्रांती संपली; आजपासून कर्मचारी पुन्हा कामावर !

जनसंचलन/ खामगाव

आर्थिक वर्षअखेरच्या मार्च एंडमधील ताणतणावातून बाहेर पडलेल्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची विश्रांती आता संपली असून, सोमवारपासून ते पुन्हा नियमित कामकाजावर रुजू होणार आहेत. महिनाभर चाललेल्या धावपळीमुळे थकलेल्या कर्मचाऱ्यांना सलग सुट्ट्यांमुळे काहीसा दिलासा मिळाला होता; मात्र नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीसह पुन्हा सलग सुट्ट्यांनंतर नव्या आर्थिक वर्षाची सुरुवात; कामांमुळे कर्मचाऱ्यांची धावपळ वाढणार कामांचा रेटा वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. दरवर्षीप्रमाणे मार्च महिन्याच्या अखेरीस सर्व शासकीय विभागांमध्ये आर्थिक व्यवहारांची पूर्तता करण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. वेतन बिले, वैद्यकीय खर्च, विविध योजनांची देयके तसेच विकासकामांसाठी मंजूर निधी खर्च करण्याची अंतिम मुदत ३१ मार्च असल्याने अधिकारी-कर्मचारी दिवस रात्र कामात गुंतलेले होते. यंदा फेब्रुवारीत झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे ही कामे उशिरा सुरू झाल्याने मार्चच्या शेवटच्या आठवड्यात ताण अधिक वाढला होता. अनेक कार्यालयांमध्ये सुट्यांच्या दिवशीही कामकाज सुरू ठेवावे लागले. महसूल, पंचायत, कोषागार, बांधकाम आदी विभागांतील कर्मचाऱ्यांची विशेष दमछाक झाली. अखेर ३१ मार्चची धावपळ संपल्यानंतर गुड फ्रायडे, शनिवार आणि रविवार अशा



सलग सुट्ट्या आल्याने कर्मचाऱ्यांना विश्रांतीची संधी मिळाली. काहींनी या काळात पर्यटनाचा बेत आखून कुटुंबासोबत वेळ घालवला, तर अनेकांनी घरीच विश्रांती घेतली. सोमवारपासून पुन्हा कार्यालये सुरू होणार असल्याने शासकीय कामकाजात हालचाल वाढणार आहे. नवीन आर्थिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रलंबित कामांचा निपटारा यावर भर दिला जाणार आहे

# त्रिकोणासनांचा करणार रेकॉर्ड!

जनसंचलन/बुलढाणा

आंतरराष्ट्रीय योग दिनाला अवघे ७५ दिवस शिल्लक असताना योगाचा प्रचार-प्रसार करण्याच्या उद्देशाने आयुष मंत्रालयाच्या वतीने ७एप्रिल रोजी लोणार येथे योग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या योग साधनेत बुलढाणा जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी पत्रकार परिषदेत केले. जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात हा कार्यक्रम होणार असून, सुमारे ७हजारांहून अधिक योग साधक सहभागी होणार आहेत. एकाच वेळी त्रिकोणासन करणाऱ्यांची सर्वाधिक संख्या नोंदवून एशियन बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये स्थान मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. योग ही भारतीय संस्कृतीतील प्राचीन परंपरा असून शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनशैली आहे.. पत्रकार परिषदेला मुरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थानचे संचालक डॉ. काशिनाथ समघंडी व कार्यक्रम अधिकारी डॉ. ईश्वर आचार्य उपस्थित होते.

# अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्गाचा दर्जा; १५ रस्त्यांची दर्जोन्नती!

## मेहकर, लोणारसह चार तालुक्यांतील रस्त्यांचा समावेश

जनसंचलन/बुलढाणा

राज्य सरकारने जिल्ह्यातील योजनाबाह्य अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे. मेहकर, लोणार, मलकापूर आणि नांदुरा तालुक्यातील एकूण १५ रस्त्यांना रस्ते विकास योजनेत समाविष्ट करून ग्रामीण वाहतुकीस प्रोत्साहन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे स्थानिक रहिवासी आणि शेतकरी समुदायाला सुरक्षित आणि दर्जेदार रस्ते उपलब्ध होतील, तसेच जिल्ह्यातील ग्रामीण संपर्क सुधारेल. राज्य सरकारने जिल्ह्यातील योजनाबाह्य अवर्गीकृत रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याची कार्यपद्धती निश्चित केली आहे. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांच्या पत्रानुसार मेहकर, लोणार, नांदुरा ३ ते ५ कि.मी. अंतराच्या रस्त्यांना दर्जोन्नती आणि मलकापूर तालुक्यांतील रस्त्यांना रस्ते विकास योजनेत समाविष्ट करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. प्रस्तावात नमूद आहे की, या रस्त्यांसाठी भूसंपादनाची आवश्यकता नाही आणि रस्ते वन जमिनीतून जात नाहीत, अशी खात्री कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद व मुख्य अभियंता प्रादेशिक विभाग, अमरावती यांनी दिली आहे. सन २००१-२१ च्या रस्ते विकास योजनेत या रस्त्यांना ग्रामीण मार्ग म्हणून मान्यता मिळाली असून, जिल्ह्यातील लोकांना दर्जेदार वाहतूक सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. मेहकर तालुक्यात कल्याणा ते नांद्रा, वरदडी वैराळ ते सांवगीवीर, उसरन ते देऊळगाव माळी आणि सावत्रा ते जानेफळ हे रस्ते दर्जोन्नत केले जातील.

# बुलढाण्यात पाणीटंचाईचे सावट एप्रिलच्या सुरुवातीलाच टँकरची मागणी वाढली!




जनसंचलन/बुलडाणा

सुरुवातीलाच बुलढाणा तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढल्याने ग्रामीण भागात भीषण पाणीटंचाईचे सावट पसरले आहे. कडक उन्हाळ्यामुळे भूजल पातळी मोठ्या प्रमाणात खालावली असून, गावांमधील विहिरींनी तळ गाठल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या संकटामुळे तालुक्यांतून टँकर सुरू करण्याची मागणी तहसील प्रशासनाकडे प्राप्त झाली आहे. ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर निर्माण झालेले हे जलसंकट आणि टंचाईग्रस्त गावांना पाणीपुरवठा करण्याचे आव्हान सध्या प्रशासनासमोर उभे ठाकले आहे. यावर्षी पुरेसा पाऊस होऊन सुद्धा भूजल पातळीत घट झाली आहे. ग्रामीण भागातील जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या सार्वजनिक आणि खासगी विहिरींनी आताच तळ गाठला आहे. अनेक गावांमध्ये पाण्याचे स्त्रोत आटल्याने महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी लांबवर पायपीट करावी लागत आहे. केवळ पिण्याच्या पाण्याचाच नाही, तर जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्नही आता गंभीर रूप धारण करू लागला आहे. वाढती मागणी आणि उपलब्ध जलसाठा यांचा मेळ घालताना प्रशासनाची मोठी कसरत होत आहे. आगामी मे महिन्यात परिस्थिती अधिकच गंभीर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर, उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करणे, अधिग्रहित विहिरींची प्रक्रिया राबवणे आणि मागणीनुसार टँकर मंजूर करणे यासाठी प्रशासकीय स्तरावर हालचाली वेगवान झाल्या आहेत.




दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८